




दैनिक **युवावार्ता**

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25



काजळे ज्वेलर्स

आजचे सोन्याचे भाव


| | |
|---|---|
| 22 कॅरेट हॉलमार्क दागिणे | = 1, 32, 280/- |
| 20 कॅरेट मणी | = 1, 20, 260/- |
| 18 कॅरेट रोज गोल्ड | = 1, 08, 225/- |
| 16 कॅरेट मुरणी | = 96, 205/- |

बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777



वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ७६ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । २८/०३/२०२६ । पान - ६







# अफवांचा फटका: आधी पेट्रोल पंपांवर गर्दी, आता शुकशुकाट







**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**संगमनेर-** जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इंधनटंचाईची शक्यता व्यक्त करणाऱ्या सोशल मीडियावरील अफवांचा फटका संगमनेरकरांना बसल्याचे चित्र नुकतेच पाहायला मिळाले. पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा तुटवडा निर्माण होणार, तसेच दरात मोठी वाढ होणार असल्याच्या चर्चेमुळे शहरातील पेट्रोल पंपांवर दोन दिवस अचानक मोठी गर्दी उसळली होती.

या अफवांवर विश्वास ठेवत नागरिकांनी घाईघाईने आपल्या वाहनांच्या टाक्या फुल करून घेतल्या. अनेकांनी तर अतिरिक्त पेट्रोल साठवण्याचाही प्रयत्न केल्याने काही पेट्रोल पंपांवर एका दिवसातच इंधन संपल्याची परिस्थिती निर्माण झाली. परिणामी, पंपांवर लांबच लांब रांगा आणि गोंधळाचे वातावरण दिसून आले.

दरम्यान, आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठा विस्कळीत होईल, असा गैरसमज सोशल मीडियावर वेगाने पसरला होता. मात्र, संबंधित यंत्रणांनी या अफवा पूर्णपणे खोट्या असल्याचे स्पष्ट केले असून, देशात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली आहे. पुरवठा सुरळीत सुरू असल्याने कोणत्याही प्रकारच्या टंचाईची शक्यता नसल्याचेही सांगण्यात आले.

अफवांचा परिणाम ओसरल्यानंतर आता परिस्थिती हळूहळू पूर्वपदावर येत आहे. ज्या पेट्रोल पंपांवर काही दिवसांपूर्वी मोठी गर्दी आणि गडबड दिसत होती ते पंप आता ओस पडल्याचे चित्र आहे. वाहनधारकांनी आधीच टाक्या फुल केल्याने सध्या पंपांवर ग्राहकांची संख्या लक्षणीयरीत्या घटली असून येथे शुकशुकाट पहायला मिळत आहे.

या संपूर्ण प्रकारातून अफवांवर विश्वास ठेवण्याचे दुष्परिणाम पुन्हा एकदा समोर आले आहेत. अपुऱ्या आणि अप्रमाणित माहितीनुसार घेतलेले निर्णय अनावश्यक गर्दी, गोंधळ आणि त्रासाला कारणीभूत ठरतात. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही माहिती मिळाल्यानंतर तिची खातरजमा करूनच कृती करावी असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

सामाजिक माध्यमांचा जबाबदारीने वापर करून अफवा पसरवणे टाळणे आणि अधिक सजग नागरिकत्व दाखवणे ही काळाची गरज असल्याचे मतही यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

**अमेरिका-इस्रायलसोबत इराणच्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर ७३ डॉलरवरून वाढून १०५ डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले आहेत. यामुळे तेल कंपन्यांना तोटा होत होता. हा तोटा भरून काढण्यासाठी तेल कंपन्यांकडून भाव वाढ करण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. त्यामुळे हा भार नागरीकांवर पडणार होता. त्यामुळे केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रत्येकी १० रुपयांची कपात केली आहे. पेट्रोल लवरील शुल्क १३ रुपये प्रति लिटरवरून ३ रुपये करण्यात आले आहे, तर डिझेलवरील शुल्क १० रुपयांवरून शून्य करण्यात आले आहे. उत्पादन शुल्क कमी करून पेट्रोल-डिझेलचे दर स्थिर ठेवण्यात आले आहेत.**

# देशात लॉकडाऊन सारखी परिस्थिती नाही - केंद्र सरकार

मुंबई (वृत्तसंस्था)

पश्चिम आशियातील संकटामुळे देशात देशव्यापी लॉकडाऊन लागू केला जाणार नाही, असे केंद्र सरकारने शुक्रवारी स्पष्ट केले. सरकारचे तीन वरिष्ठ मंत्री-निर्मला सीतारामन, किरण रिजिजू आणि हरदीप पुरी-यांनी निवेदने जारी करून या केवळ अफवा असल्याचे स्पष्ट केले. परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे रिजिजू यांनी नमूद केले आणि खुद्द पंतप्रधान मोदी स्वतः या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचेही त्यांनी सांगितले.

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनीही जनतेला घाबराट निर्माण न करण्याचे आवाहन केले आणि लॉकडाऊन लागू करण्याचा सरकारचा कोणताही इरादा नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित केले. वास्तविक पाहता, चार दिवसांपूर्वी संसदेत पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या एका विधानानंतर लॉकडाऊनबाबतच्या अफवा पसरण्यास सुरुवात झाली होती.

सध्या सुरू असलेल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या कठीण जागतिक परिस्थितीचा परिणाम दीर्घकाळ टिकण्याची शक्यता आहे, असे त्यांनी म्हटले होते. अशा प्रकारच्या आव्हानांचा सामना देशाने यापूर्वीही, अगदी कोविड-१९ महामारीच्या काळातही, एकजुटीने आणि एकोप्याने केला आहे, असेही त्यांनी पुढे नमूद केले. आज संध्याकाळी पंतप्रधान सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचेही नियोजित आहे. संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी स्पष्ट केले, या सर्व अफवा कोण पसरवत आहे? पंतप्रधानांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, घाबरण्याची काहीही गरज नाही. साठेबाजांना (होर्डर्सना) इशारे देण्यात आले आहेत आणि राज्य सरकारांना साठेबाजी होणार नाही याची खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संपूर्ण परिस्थिती भारत सरकारच्या पूर्णपणे नियंत्रणात आहे. सर्वसामान्य जनतेला कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी, अगदी सर्वोच्च स्तरापासून ते तळागाळापर्यंत - प्रत्येक पातळीवर देखरेख केली जात आहे; खुद्द पंतप्रधानही स्वतः या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी नमूद केले की, लॉकडाऊनबाबत पसरणाऱ्या अफवा पूर्णपणे खोट्या आहेत. मला हे स्पष्ट करायचे आहे की, सध्या सरकारी पातळीवर अशा कोणत्याही प्रस्तावाचा विचार सुरू नाही. अशा वेळी, आपण सर्वांनी शांत, जबाबदार आणि एकजूट राहणे अत्यंत आवश्यक आहे. अशा परिस्थितीत अफवा पसरवणे आणि अनावश्यक भीतीचे वातावरण निर्माण करणे हे बेजबाबदारपणाचे लक्षण आहे.

# संगमनेरात श्रीरामनवमी निमित्त भव्य-दिव्य शोभायात्रा उत्साहात



छाया - प्रसाद सुतार, संगमनेर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्रीरामनवमीच्या पावन निमित्ताने संगमनेर शहरात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, मातृशक्ती - दुर्गावाहिनी, संगमनेर प्रखंड तसेच तमाम संगमनेरकरांच्यावतीने पश्चिम महाराष्ट्रातील सर्वांत भव्य-दिव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. या शोभायात्रेची सुरुवात सायंकाळी ६ वाजता अभिनव नगर, नवीन नगर येथील श्रीराम मंदिरात महाआरतीने झाली.

या महाआरतीस प्रा.एस. झेड. देशमुख सर, आमदार अमोल खताळ, उद्योजक मनीष मालपाणी सपत्नीक, संगमनेर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मैथिलीताई तांबे, सर्व नगरसेवक तसेच विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गावाहिनी व विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शोभायात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे सुरुवातीपासूनच शहरातील चौकाचौकात आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. सनई-चौघडा, भजनी मंडळ, गोमाता, श्रीकृष्ण दर्शन, उज्जैन शैलीतील डमरू वादन, महादेव व दत्तमूर्ती, नवनाथांचा जिवंत देखावा, भारतमाता व खाटू श्यामजींच्या मूर्ती तसेच श्रीराम दरबाराचे देखावे भाविकांचे लक्ष वेधून घेत होते. या सर्व देखाव्यांचे भाविकांनी मोठ्या उत्साहात दर्शन घेतले.

ही शोभायात्रा नवीन नगर रोड, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, अशोक चौक, चावडी, मेन रोड, सय्यद चौक, तेलीखुंट, नेहरू चौक मार्गे चंद्रशेखर चौक येथे पोहोचली. मार्गावरील विविध चौकांमध्ये कंकाळ रथावरील कालिका माता अवताराचा लाईव्ह शो तसेच तिरुपती बालाजीचा देखावा पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

मोटमल बॅण्डच्या जय श्रीराम घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. तरुणाईने उत्स्फूर्तपणे नृत्य करत उत्सवाचा आनंद लुटला. विशेष म्हणजे महिला व मुलींसाठी स्वतंत्र 'लाडली डी.जे.'ची व्यवस्था करण्यात आली होती, ज्यामुळे महिलांचा सहभागही मोठ्या प्रमाणात दिसून आला.

दरम्यान, नवीन नगर रोड येथे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या कार्यकर्त्यांसह अरगडे मळा येथील मारुती मंदिर ट्रस्ट, बाजारपेठ मित्र मंडळ, मेन रोड व चंद्रशेखर चौक येथील स्वागत समित्यांनी शोभायात्रेवर पुष्पवृष्टी, पेपर ब्लास्ट व फटाक्यांच्या आतिषबाजीद्वारे भव्य स्वागत केले. तसेच चहा, पाणी, सरबत व मठ्ठा चौका चौकात वाटप करण्यात आला.

एकूणच, धार्मिक उत्साह, सांस्कृतिक परंपरा आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संगमनेरातील ही श्रीरामनवमी शोभायात्रा अविस्मरणीय ठरली. संगमनेरात धार्मिक उत्साह, संस्कृती आणि एकतेचा सुंदर संगम अनुभवास आला. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि भक्तिभावाने उत्सव अधिकच रंगतदार झाला.

**श्रीरामनवमी निमित्त संगमनेर तालुक्यात विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या ५३ शाखांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. या अंतर्गत श्रीराम पूजन, भजन-कीर्तन, महाआरती आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.**









# माझ्यात आणि आदित्य ठाकरेंमध्ये मतभेद नाहीत - खा. संजय राऊत

मुंबई - वृत्तसंस्था)

माझ्यामध्ये आणि आदित्य ठाकरेंमध्ये कसले मतभेद आहेत, या बातम्या अत्यंत चुकीच्या आहेत. मी शिवसेनेमध्ये जन्मापासून आहे. पक्षात काही राज्यसभेचा खासदार होण्यासाठी मी आलो नाही, मंत्री होण्यासाठी आलो नाही. बाळासाहेबांचा विचार महाराष्ट्रात नेण्यासाठी काम करतो, मी स्वतःला एक शिवसैनिक मानतो, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.



संजय राऊत म्हणाले की, एखाद्या पदाचा केव्हा तरी निरोप घ्यावा लागतो. त्यांची मानसिक तयारी आपण ठेवली पाहिजे. आम्हाला वाटले होते उद्धव ठाकरे अजून १५ वर्षे मुख्यमंत्री असावे पण तसे झाले नाही. आमच्या पक्षावर जे संकट आहे फोडाफोडीचे आमचा पक्ष वाढवण्याचे त्यासाठी आम्ही काम करणार आहोत. उद्धव ठाकरे २०१९ मध्ये मुख्यमंत्री झाले तेव्हा ते आमदार नव्हते हे समजून घेतले पाहिजे. २०२९ मध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री व्हावे, यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. मी उबाठा कधीही सोडणार नाही.

खा. संजय राऊत म्हणाले की, भोंदू गिरी, बुआबाजी यावर मी कधी बोलत नाही. राज्यकर्त्यांनी अशा भोंदू बाबाच्या नादाला लागू नये असे माझे मत आहे. सध्या दिसतंय की खरातला महान बनवण्यासाठी आताच्या सरकारमधील

# श्रीक्षेत्र निझर्णेश्वर येथे अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात सुरू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्रीक्षेत्र निझणेश्वर मंदिर कोकणगाव तालुका संगमनेर जिल्हा अहिल्यानगर, या ठिकाणी परमपूज्य सद्गुरु गंगागिरी महाराज यांनी सुरू केलेला तसेच वैकुंठवासी नारायणगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने १३५ वा अखंड हरिनाम रामनवमी ते हनुमान जयंती या कालखंडात पार पडत आहे. त्यानिमित्ताने कोकणगाव इथून गुरुवार दिनांक २६ मार्च रोजी सकाळी कलश आणि भव्य ग्रंथ मिरवणूक, त्यानंतर घटस्थापना करण्यात आली. दुपारी भजन तसेच राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर या ठिकाणी महाप्रसाद देण्यात आला. यावेळी कोकणगाव येथील भजनी मंडळ, तरुण मित्र मंडळ, देवस्थान विश्वस्त मंडळ तसेच निझरनेश्वर विद्यालयाचे विद्यार्थी त्याचबरोबर पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान गुरुवार २ एप्रिल रोजी सकाळी हनुमान जन्मोत्सव व गोपाजीबाबा प्राणप्रतिष्ठा सोहळा त्यानंतर ह.भ.प. महामंडलेश्वर १००८ गोरखगिरी महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या अखंड हरिनाम सप्ताहसाठी मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# राज्यात ३०-३१ मार्च दरम्यान वादळी पावसाची शक्यता



मुंबई (वृत्तसंस्था)

सध्या राज्यातील काही भागात अंशतः ढगाळ हवामान असून ही स्थिती या आठवड्यात कायम राहण्याची शक्यता आहे. राज्याच्या दक्षिण भागांमध्ये दुपारनंतर स्थानिक स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस प्रामुख्याने कर्नाटक व तेलंगणा सीमेलगत असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील सीमावर्ती भागांमध्ये राहण्याची शक्यता आहे.

दि. ३० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. उर्वरित विदर्भात देखील हवामानात बदल दिसू शकतो. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता नाकारता येत नाही. ३१ मार्च रोजीदेखील राज्याच्या काही भागांमध्ये या हवामानाचा परिणाम दिसू शकतो.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.



संगमनेर - पवित्र रमजान ईद निमित्त समाजातील परस्पर स्नेहभाव वाढावा यासाठी मुस्लिम समाजातील मान्यवर विविध क्षेत्रातील मान्यवरांना खास शिरखुर्माचे निमंत्रण देत असतात. असाच स्नेहभाव जपणारे मिर्झा पठाण उर्फ लुकड्या पहिलवान यांच्या घरी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# पिंपरणेत बी. जे. खताळ पाटील यांची जयंती साजरी

युवावावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राच्या राजकारणासोबतच साहित्य क्षेत्राच्या पटलावरील ऋषीतुल्य व्यक्तिमत्व म्हणून परिचित असलेल्या माजी मंत्री बी. जे. खताळ पाटील यांचा गांधीजींच्या 'चले जाव' चळवळीत सहभाग होता.१९६२ ते ८० च्या काळात २० वर्षे ते आमदार होते. त्यांच्या मंत्रिपदाच्या काळात त्यांनी पाटबंधारे मंत्री यासह अनेक खात्याची जबाबदारी सांभाळली. प्रत्येक खात्यावर त्यांची विशेष अशी छाप होती. त्यांच्या कारकिर्दीत सर्वाधिक धरणांची निर्मिती झाली होती. निळवंडे धरणाची मान्यता मा. मंत्री बी. जे. खताळ पाटील यांनी दिली याचा विसर पडता कामा नये संगमनेरच्या विकासात बी. जे. खताळ पाटलांचे मोठे योगदान राहिले आहे. त्यामुळे संगमनेर बस



स्थानकाला माजी मंत्री बी. जी. खताळपाटील यांचे नाव देण्यात यावे.

पिंपरणे गावच्या विकासासाठी त्यांचे खूप मोठे योगदान होते असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते शुभम देशमुख यांनी केले. संगमनेर तालुक्यातील पिंपरणे येथे मंत्री बी जे खताळ पाटिल यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शुभम देशमुख, शिवराम वाकचौरे, अरुण देशमुख, ग्रा. प. सदस्य उत्तमनाना राहींज, डी. एम. देशमुख, सुरेश ठोंबरे, रामनाथ ठोंबरे, गोरक्षनाथ कर्पे, बिरू राहिंज, दत्तू राहींज, नितीन गडाख, बाळासाहेब साळवे, रामनाथ काळे, धोंडीबा साळवे, सुधाकर कर्पे, भीमा राहीन, राजू बागुल, अनिल ठोंबरे करण साळवे, आदींसह ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. देशमुख पुढे म्हणाले की कोल्हापूरचे दुधगंगा-वेदगंगा, सांगलीचे चांदोली-नांदोली, पुण्याचे चासकमान, नांदेडचे विष्णुपुरीसह राहुरीच्या मुळा धरणाला गती देण्याचे काम त्यांच्याच काळात झाले होते. कडक शिस्त, कमालीची तत्वनिष्ठा आणि प्रामाणिकपणा यामुळे त्यांची राज्यात विशेष ओळख होती.

कार्यक्रमाचे आयोजन शुभम देशमुख मित्र मंडळाने केले होते

# पेट्रोल-डिझेलवरील निर्बंध शिथिल

मुंबई (वृत्तसंस्था)

पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेले निर्बंध आता शिथील करण्यात आले आहेत. जिल्हा पुरवठा विभागाने याबाबत महत्त्वाचा निर्णय घेत दोन दिवसांपूर्वी काढलेला आदेश मागे घेतला आहे. पेट्रोल पंपांवर नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याने प्रशासनाने २०० रुपये आणि २००० रुपयांपर्यंतच इंधन देण्याची मर्यादा घातली होती. मात्र आता परिस्थिती नियंत्रणात आल्याचे सांगत हा निर्णय रद्द करण्यात आला आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जालना जिल्ह्यात सध्या पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. बीपीसीएल, आयओसीएल, एचपीसीएल यांसारख्या तेल कंपन्यांकडून नियमित पुरवठा सुरू असून, कोणत्याही प्रकारचा तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून इंधनाचा साठा करण्याची गरज नसल्याचेही प्रशासनाने सांगितले आहे. सध्याच्या स्थितीत इंधन पुरवठा सुरळीत सुरू असल्याने निर्बंध ठेवण्याचे कारण उरले नसल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले.गेल्या काही दिवसांत सोशल मीडियावर आणि अफवांमुळे इंधन टंचाईबाबत चुकीची माहिती पसरली होती. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर पेट्रोल पंपांवर गर्दी केली. या परिस्थितीमुळे काही ठिकाणी तात्पुरता तणाव निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीचा उपाय म्हणून इंधन भरण्यावर मर्यादा घातली होती. मात्र आता परिस्थिती स्थिर



झाल्याने हा निर्णय मागे घेण्यात आला आहे.

जालना जिल्हाधिकारी कार्यालयाने जारी केलेल्या नव्या आदेशानुसार, २५ मार्च २०२६ रोजी काढलेला निर्बंधांचा आदेश रद्द करण्यात आला आहे. आता सर्व पेट्रोल पंपांवर नियमित पद्धतीने इंधन विक्री सुरू राहणार आहे. नागरिकांना पूर्वीप्रमाणे कोणत्याही मर्यादेशिवाय पेट्रोल आणि डिझेल मिळणार आहे. त्यामुळे वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अनावश्यक गर्दी टाळावी. इंधनाचा पुरवठा नियमित असून कोणतीही कमतरता नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. पुढील काळातही परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ती पावले उचलली जातील, असे प्रशासनाने सांगितले आहे.

# पार्थ पवारांना क्लीन चिट देता येणार नाही

## मुंढवा प्रकरणी अंजली दमानियांचा मुख्यमंत्र्यांना थेट सवाल

मुंबई (वृत्तसंस्था)

पुण्यातील मुंढवा येथील बहुचर्चित जमीन गैरव्यवहार प्रकरणात 'खारगे समिती'चा अहवाल समोर आल्यानंतर आता राजकीय वातावरण तापू लागले आहे. या अहवालात शीतल तेजवानी आणि दिग्विजय पाटील यांच्यावर ठपका ठेवण्यात आला असतानाच, आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी थेट पार्थ पवार यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे पवार कुटुंबातील सदस्य पुन्हा एकदा चौकशीच्या फेऱ्यात अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

खारगे समितीने आपल्या निरीक्षणांमध्ये 'अमेडिया' कंपनी



आणि त्यातील भागीदारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अंजली दमानिया यांनी या मुद्द्याकडे लक्ष वेधताना सांगितले की, अहवालात उल्लेख असलेल्या 'इतर भागीदार' या शब्दांत पार्थ पवार यांचा समावेश होतो. शीतल तेजवानी यांनी पार्थ पवार यांना 'नोटराईज्ड पॉवर ऑफ टर्नी' दिल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट होत असल्याचा दावा दमानिया यांनी केला आहे. याबाबत त्यांनी यापूर्वीच पत्रकार परिषदेत सविस्तर खुलासा केला होता. अंजली दमानिया म्हणाल्या की, हे संपूर्ण प्रकरण फौजदारी स्वरूपाचे असल्याचे समितीने आपल्या निरीक्षणात नोंदवले आहे. त्यामुळे खारगे समिती हा अहवाल आता पुढील कार्यवाहीसाठी गृह, उद्योग आणि महसूल विभागाकडे पाठवणार आहे. राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या विभागाची जबाबदारी असल्याने, त्यांनी या अहवालातील मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती दमानिया यांनी केली आहे.

# आखाती तणावामुळे इंधन संकट तीव्र

## मार्च-एप्रिलमध्ये केरोसीन वाटप; शिधापत्रिकाधारकांना लाभ

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीचा सामना देशातील सर्वसामान्य नागरिकांनाही बसत असून गॅसटंचाईमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. एकीकडे गॅस एजन्सीमध्ये गॅस पुरवठ्याबाबत काही नियमावली तयार करण्यात आली असून व्यावसायिक गॅस पुरवठाही बंद करण्यात आला आहे. त्यातच, आता युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचं पाऊल उचललं असून केंद्र सरकारकडून ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपास राज्याला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे, गॅस आल्यानंत कुठेतरी कोपऱ्यात पडलेला स्टोव्ह आता पुन्हा बाहेर काढावा लागणार आहे. राज्यातील शिधापत्रिका धारकांना ३ लिटर केरोसीन मिळणार आहे.

प्रति कुटुंब किंवा शिधापत्रिका असलेल्यांना एका शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. एलपीजी तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तात्पुरता स्वरुपात केरोसीन वाटप केले जाणार असल्याची माहिती आहे. राज्य सरकारकडून जिल्हानिहाय आवश्यक केरोसीन वितरण निश्चित केले असून मार्च-एप्रिल २०२६ मध्ये राज्यात तिन्ही सरकारी तेल कंपन्यांकडून केरोसीन वाटप केले



जाणार आहे. एकूण वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात सोडण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. त्यामुळे, ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका आहे, त्यांना प्रत्येक कुटुंबास ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. तर, ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही असे कुटुंब देखील केरोसीन उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील. प्रतिसादाच्या अनुषंगाने श्वेतपत्रिकाधारक देखील केरोसीन मिळण्यास पात्र असतील, अशी माहिती आहे.

आखाती देशातील इराण आणि अमेरिका, इस्रायल युद्धाचा परिणाम जागतिक बाजारपेठेवर होत असून तेल आणि इंधन पुरवठा अपुरा पडत असल्याचे दिसून येते. घरगुती ग्राहकांना कुठलीही अडचण भासणार नाही, यासाठी शासनाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखील संसदेत बोलताना कोरोनासारख्या परिस्थितीसाठी आपण सज्ज राहायला हवं असे आवाहन देशावासीयांना केले आहे. त्यातच, गॅसटंचाईच्या पार्श्वभूमीवर आता सरकारकडून केरोसीन वितरणास परवानगी देण्यात आली आहे.

# परिवहन विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार

## निलंबित अधिकाऱ्याचे नाव घेत वडेट्टीवारांचा आरोप

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याच्या परिवहन विभागात भ्रष्टाचाराचे महाजाळे पसरले असून, बदल्या आणि बेकायदेशीर वसुलीसाठी एक मोठी 'समांतर यंत्रणा' सक्रिय असल्याचा खळबळजनक आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. एका निवृत्त अधिकाऱ्याच्या इशाऱ्यावर हे रॅकेट चालत असून, प्रामाणिक अधिकाऱ्यांना जाणीवपूर्वक खोट्या गुन्ह्यांत अडकवले जात असल्याचे त्यांनी नागपूर येथील पत्रकार परिषदेत पुराव्यासह मांडले. विजय वडेट्टीवार यांनी थेट नाव घेत परिवहन विभागाचे निवृत्त अधिकारी बजरंग खरमाटे यांच्यावर निशाणा साधला. खरमाटे हे या संपूर्ण वसुली रॅकेटचे मास्टरमाइंड असून त्यांनी स्वतःची समांतर यंत्रणा उभी केली आहे. राज्यात परिवहन विभागात १०० रुपयांची वसुली झाली, तर



त्यातील ९० रुपये स्वतः खरमाटे घेतात, असा खळबळजनक दावा वडेट्टीवारांनी केला. चंद्रपूरचे मोटार वाहन निरीक्षक पवन पोटदुखे यांच्यावर झालेली एसीबीची कारवाई हा याच रॅकेटचा एक भाग असून, त्यांना अडकवण्यासाठी रचलेला तो 'प्री-प्लॅन्ड' कट असल्याचेही त्यांनी सांगितले.

विदर्भात नव्याने रुजू झालेल्या ६४ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीत जाणीवपूर्वक अडथळे आणले जात आहेत. खैरनार आणि भुयार यांच्या मर्जीने या नियुक्त्या झाल्या नसल्यामुळे आता या अधिकाऱ्यांना लक्ष्य केले जात आहे. जे अधिकारी बेकायदेशीर वसुलीला नकार देतात, त्यांना एसीबीच्या जाळ्यात अडकवण्याची किंवा तडकाफडकी बदली करण्याची धमकी दिली जाते, असा गंभीर आरोप वडेट्टीवारांनी केला. याप्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री आणि परिवहन मंत्र्यांना पत्र लिहून चौकशीची मागणी केली आहे.अशोक खरात प्रकरण आणि मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या शासकीय निवासस्थानाच्या वापरावरून वडेट्टीवारांनी सरकारवर बोचरी टीका केली. काही लोक खुर्ची टिकवण्यासाठी किंवा विरोधकांना हटवण्यासाठी अघोरी विद्या आणि तंत्र-मंत्राचा आधार घेत आहेत. संविधानाची शपथ घेणाऱ्या मंत्र्यांना हे शोभा देत नाही, असे ते म्हणाले.

# दाभोलकरांच्या वारशावरून राजकीय वादंग

मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा वारसा चालवत आहेत. हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा. सुप्रिया सुळे यांचे विधान दिशाभूल करणारे, चिड व संताप आणणारे आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर व देवेंद्र फडवणीसांची तुलना होऊच शकत नाही, दोघांच्या विचाराचा वारसा व मार्ग भिन्न आहेत असे स्पष्ट करून खा. सुप्रिया सुळे यांनी त्यांचे विधान मागे घ्यावे, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. सुप्रिया सुळे यांच्या विधानाचा समाचार घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी अंद्धश्रद्धेचे निर्मुलन व्हावे, समाज जाणता व्हावा यासाठी आयुष्य खर्ची घातले व ते कार्य करत असतानाच ते शहीद झाले.

दाभोलकरांचा वारसा हा शिव, शाहु, फुले, आंबेडकरांचा, अंधश्रद्धा निर्मुलनाचा, सत्य व अहिंसेचा आहे, वारकरी संप्रदायाला पुढे घेऊन जाणारा आहे. दाभोलकरांचे योगदान मोठे आहे, तर देवेंद्र फडणवीसांचा मार्ग हा अंधश्रद्धेकडे घेऊन जाणारा आहे, पुरोगामी विचाराला बाजूला ठेवून प्रतिगामी विचाराला चालना देणारा आहे, अंधश्रद्धेच्या खाईत ढकलणारा, भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालणारा आहे, दोघांचा मार्ग एक असूच शकत नाही. ज्यांनी शिवाजी महाराजांचा वारसा नाकारला, तुकारामांच्या गाथा बुडवल्या, त्यांचे वैचारिक वारसादार फडणवीस आहेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना विरोध करणारा वारसा फडणवीस पुढे घेऊन जात आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काळाराम मंदिरात प्रवेश नाकारणाऱ्यांचा वारसा त्यांचा आहे. संविधान गुंडाळून बंच ऑफ थॉट चा संघाचा वारसा पुढे घेऊन जाणारा विचार फडणवीस यांचा आहे, असेही सपकाळ म्हणाले.हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, डॉ. नरेंद्र दाभोलकर हे मला भावासारखे आहेत, अंधश्रद्धा निर्मुलन कायद्याच्या मसुदा समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील होते तर मी त्या समितीचा सदस्य होतो. खासदार सुप्रिया सुळे यांच्या वक्तव्यावर मी दुःख व खंत व्यक्त करतो. सुप्रिया सुळे यांना त्यांचे वडील शरद पवार यांच्या पुरोगामी विचाराचा तसेच ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील यांच्या विचाराचा वारसा लाभलेला आहे, याची जाणीव आणि भान त्यांनी ठेवावे. सुप्रिया सुळे चोर आणि संन्यासी दोघांना एकत्र दाखवत आहेत, त्यांचे वक्तव्य चिड व संताप आणणारे आहे, त्यावर त्यांनी खुलासा करून विधान मागे असे आवाहन हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

# शाळांच्या नावांची काटेकोर तपासणी होणार

राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न असूनही नावामध्ये 'ग्लोबल', 'इंटरनॅशनल' किंवा 'सीबीएसई' असे शब्द वापरून पालकांची दिशाभूल करणाऱ्या शाळांविरुद्ध शिक्षण विभागाने दंडुका उगारला आहे. शिक्षण संचालनालयाने ६ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशाची अंमलबजावणी मार्च महिन्यापासून राज्यभर सुरू झाली असून, अपात्र शाळांच्या नावातील हे भपकेबाज शब्द तत्काळ वगळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**काय आहे नवीन नियम -**

सीबीएसई - हा शब्द केवळ केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिकृत शाळांनाच वापरता येईल. इंटरनॅशनल/ग्लोबल: हे शब्द वापरण्यासाठी शाळेची परदेशातील शाखा किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील अधिकृत संलग्नता असणे अनिवार्य आहे. कठोर तपासणी - नवीन शाळांची मान्यता किंवा दर्जावाढीचे प्रस्ताव सादर करताना नावांची काटेकोर तपासणी केली जाणार आहे.

**शिक्षणाच्या व्यापारीकरणाला आळा बसवणारे पाऊल -**

पालकांनी मुलांच्या शाळेतील प्रवेशावेळी 'इंटरनॅशनल' किंवा 'ग्लोबल' नावामागील शासन परवानगीबाबत पडताळणी करावी. शिक्षण विभागाने घेतलेली भूमिका ही पहिली पायरी आहे. आता पालकांची फसवणूक थांबावी, शिक्षणातील व्यापारीकरणाला आळा बसावा, आणि विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा शिक्षण व्यवस्थेवर बसावा यासाठी कठोर अंमलबजावणीची गरज आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# संगमनेरला राम जन्मोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा

## आ. अमोल खताळ व नीलम खताळ यांच्या हस्ते सपत्नीक महाआरती

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर शहर आणि तालुक्यातील विविध राममंदिरात प्रभू श्रीरामचंद्र यांचा जन्मोत्सवाचा सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी आमदार अमोल खताळ, पत्नी नीलम खताळ, उद्योजक राजेश मालपाणी, पोलीस निरीक्षक समीर बारवकर, योगराज परदेशी आदी रामभक्तांच्या हस्ते प्रभू रामचंद्रांची महाआरती करण्यात आली.



संगमनेर शहरातील चंद्रशेखर चौकातील राममंदिरामध्ये श्रीराम जयंती उत्सव समितीच्या वतीने मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास महिला रामभक्तांनी एकत्रित येत पारंपरिक पद्धतीने रामजन्माचा पाळणा गात, हातात दोरी धरून प्रभू श्रीरामांचा पाळणा हलवत भक्तिमय वातावरणात जन्मोत्सव साजरा केला. यावेळी रामभक्तांनी दिलेल्या जय श्रीरामच्या घोषणांनी राम मंदिराचा परिसर संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

यावेळी राम जन्मोत्सव समितीच्या वतीने आमदार अमोल खताळ, पत्नी नीलम खताळ, उद्योजक राजेश मालपाणी, पोलीस निरीक्षक समीर बारवकर, ऋषिकेश मोंढे, राम मंदिर ट्रस्ट विश्वस्त उपासनी बंधू, विजय नागरीचे उपाध्यक्ष विशाल जाखडी यांचा श्रीराम नवमी व हनुमान जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सोमनाथ पराई, उपाध्यक्ष कमलाकर भालेकर, विनय गुणे, गिरीश देशपांडे, श्रीराम गणपुले, वरद बागुल, मुन्ना जोशी, योगेश मंगलकर, राम वामन, विनायक तांबे, विलास परदेशी, योगराज परदेशी, अक्षय थोरात आणि ऋषिकेश मुळे आदींच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी शहरातील प्रभू रामचंद्र यांचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने रामभक्तांनी गर्दी केली होती. यावेळी रामजन्मोत्सव समितीच्या वतीने राम मंदिरात दर्शनासाठी आलेल्या सर्व रामभक्तांसाठी थंडगार मठ्ठ्याची व्यवस्था करण्यात आलेली होती. संगमनेर शहरातील चंद्रशेखर चौक, पंजाबी कॉलनी तसेच नवीन नगर रोडवरील अभिनव नगर येथील राम मंदिरांमध्ये राम जन्मोत्सवाची जय्यत तयारी सुरू होती. आकर्षक फुलांनी राम मंदिराची सजावट करण्यात आली होती तसेच सर्व राम मंदिरे आकर्षक रोषणाईने उजळून निघाले होते.

# अश्लील व्हिडिओ व्हायरल प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)- नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात याचे अश्लील व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. या प्रकरणात अनेक पीडित महिला असण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित कोणत्याच महिलेची ओळख उघड होणार नाही, याची पोलिसांकडून खबरदारी घेतली जात आहे. अश्लील व्हिडिओ व्हायरल केल्याप्रकरणी कोपरगाव पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचे कोणाकडे व्हिडिओ असल्यास ते तत्काळ डिलीट करा. व्हिडिओ व्हायरल करणाऱ्याविरुद्ध संबंधितांवर गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिला आहे.

भोंदूबाबा खरात विरुद्ध नाशिकच्या सरकारवाडा पोलिस ठाण्यात विविध प्रकारचे आठ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्या सर्वच गुन्ह्यांचा तपास नाशिकच्या विशेष पथकाकडून (एसआयटी) सुरू आहे. या तपासादरम्यान असे निदर्शनास आले आहे की, या गंभीर प्रकरणातल्या महिलांचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्यात येत आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातल्या कोपरगावच्या एका सोशल मीडिया ग्रुपवर (ता. २५) रोजी व्हिडिओ व्हायरल झाला होता. या प्रकरणी आरोपी राहुल गंगाधर शिंदे (कोपरगाव) याने मोबाईलवरून पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ प्रसारित केले आहेत. या संदर्भात पोलिसांनी अधिक तपास केला असता, राहुल शिंदे याला सदरचे व्हिडिओ योगेश पंढरीनाथ आढाव (रा. कोपरगाव) याने पाठविले असून, योगेश आढावला ते व्हिडिओ त्याचा मित्र संदीप गर्जे (रा. माजलगाव, बीड) याने पाठविले असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

## जाहीर निविदा सूचना

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या पचांयत समिती ता. नगर तालुका स्तरावर जिल्हा परिषद आवारातील जुन्या धोकादायक झालेल्या/मोडकळीस आलेल्या जुनी लघुपाट बंधारे इमारत दक्षिण व पशुसंवर्धन अभिलेख कक्ष इमारत पाडण्याची कामांची जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत योग्यत्या नमुदकंत्राटदाराकडून बी–१ निविदा मागविण्यात येत आहे.

### इमारत निर्लेखन पंचायत समिती स्तर सन २०२५/२०२६

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाना रक्कम | निविदा फॉर्म फी | मक्तेदार वर्ग | निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती ता. नगर तालुका स्तरावर जिल्हा परिषद आवारातील जुन्या धोकादायक झालेल्या/मोडकळीस आलेल्या जुनी लघुपाट बंधारे इमारत दक्षिण व पशुसंवर्धन अभिलेख कक्ष इमारत पाडणे | २,२३,०९५/– | ५९०/– | ओपन | २,२२,५९५/– |

१. वरीलप्रमाणे दिनांक २७/०३/२०२६ ते दिनांक ०६/०४/२०२६ या कालावधीत (सुटीचे दिवस वगळून), सकाळी १०,०० ते सायं.१७.०० वा. पर्यंत कार्यालयीन वेळेत जि. प. सा. बां. उपविभाग, नगर या कार्यालयात निविदा विक्री व स्विकारली जाईल.
२. दिनांक– ०६/०४/२०२६ सायं. १७.०० नंतर आलेल्या निविदा ग्राहय धरल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.
३. निविदा जिल्हा परिषद नोंदणी केलेल्या ठेकेदारानेच दाखल करावयात. अन्य कंत्राटदाराने दाखल केलेल्या निविदा ग्राहय धरल्या जाणार नाही.
४. कामासंदर्भात सर्व अटी, शर्ती, अंदाजपत्रक जि. प. सा. बां. उपविभाग, नगर या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.
५. कामाची देयके मोजमाप पुस्तीकेनुसार व उपलब्ध अनुदानानुसार अदा केली जातील.
६. निविदे सोबत (१) नोंदणी प्रमाणपत्र (अनुभव नसल्यास ५००/–रु.च्या बॉन्डवर प्रतिज्ञापत्र तसेच सोबतीचे कागदपत्रे सत्य असल्याबाबत ५००/– रु. चे बॉन्डवर प्रतिज्ञापत्र आवश्यक राहील.
७. बी–१ फॉर्मवर प्रत्येक पानावर शिक्का व स्वाक्षरी आवश्यक आहे.
८. ठेकेदाराने दर, निविदा संचासोबत दिलेल्या बी. ओ. क्यु. मध्येच सादर करावेत.
९. निविदा दि. ०७/०४/२०२६ सकाळी ११.०० वा पंचायत समिती कार्यालय नगर येथे उघडण्यात येतील.
१०. वरीलप्रमाणे अटी व शर्ती मान्य असणाऱ्या कंत्राटदारांनीच निविदा सादर करावयात. अपूर्ण निविदा कोणतीही पूर्वसूचना न देता रदद करण्यात येतील.
११. एखादी किंवा पुर्ण निविदा नाकारण्याचा अथवा रदद करण्याचा अधिकार पंचायत समिती–नगरने राखून ठेवला आहे.

उप अभियंता
जि.प.सा.बां. उपविभाग, नगर

गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी)
पंचायत समिती, नगर

# कोपरगाव व्यापारी महासंघाच्या अध्यक्षपदी काका कोयटे

## कार्याध्यक्षपदी अजित लोहाडे व सुधीर डागा यांची फेरनिवड

कोपरगाव (युवावार्ता प्रतिनिधी)- कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाच्या अध्यक्षपदी ओमप्रकाश तथा काका कोयटे, कार्याध्यक्षपदी अजित लोहाडे व सुधीर डागा यांची फेरनिवड करण्यात आली.

बैठकीत तालुक्यातील नामांकित उद्योजक संजय भन्साळी व एस. जे. एस. हॉस्पिटलचे चेअरमन चांगदेव कातकडे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. युवा उद्योजक यश विसपुते यांची संचालक म्हणून कार्यकारिणीत नवनियुक्ती करण्यात आली. महासंघाच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत या निवडी करण्यात आल्या.



काका कोयटे यांच्या नेतृत्वाखाली कोपरगाव तालुका किराणा मर्चेंट असोसिएशन व कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाच्या माध्यमातून किराणा दुकानदारांपासून ते छोटे-मोठ्या व्यापाऱ्यांसाठी विविध योजना, सवलती व मार्गदर्शन करून त्यांना सक्षम बनविण्याचे काम करण्यात आले आहे. २४ मे रोजी तालुक्यात उद्योजकतेला चालना देण्यासाठी 'गाव तेथे उद्योजक' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र मानगावे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

कार्यकारिणी अशी : ओमप्रकाश तथा काका कोयटे, कार्याध्यक्ष अजित लोहाडे व सुधीर डागा, महासचिव प्रदीप साखरे, उपाध्यक्ष - राजकुमार बंब, नारायण अग्रवाल, संजय भन्साळी, केशवराव भवर, आशुतोष पटवर्धन, चांगदेव कातकडे, खजिनदार - तुलसीदास खुबाणी, सचिव गुलशन होडे, सहसचिव - महावीर सोनी व किरण शिरोडे यांचा समावेश आहे. कृष्णा उदावंत, योगेश बागूल, बबलू वाणी, चेतन खुबाणी, सुमित भट्टड, शरद खरात, दीपक गुजराथी, हेमचंद्र भवर, संजय दुशिंग, संदीप काबरा, युवराज गांगवे, सानंद लोढा, प्रमोद मुंदडा, अक्षय सोनेकर यांची संचालकपदी निवड करण्यात आली आहे.

# नवोदय परीक्षेत सर्वोदय विद्यालयाची दमदार कामगिरी

राजूर (युवावार्ता प्रतिनिधी)- गुरुवर्य रा. वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नवोदय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाचा गौरव वाढवला आहे. सन २०२५-२६ शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या नवोदय परीक्षेत २० पैकी तब्बल ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या परीक्षेत विद्यालयाचा निकाल ५५.०० टक्के इतका लागला आहे.




साबळे ओम राजेविनोद - ८३.७५, शौर्य विजय वालतुले - ७३.७५, निहाल जगन्नाथ कचरे - ७३.७५, मयुरी भगवंता चौधरी - ७०.००, प्रीतम काळू भांगरे - ६७.५०, काव्या निलेश मुतडक - ६७.५०, आर्या जयराम धादवड - ६६.२५, स्वराली विनोद काठे - ६३.७५, प्राप्ती नवनाथ भांगरे - ६०.००, रुद्र अमित बांबेरे - ५८.७५, श्रीधर बिपिन धुमाळ - ५१.७५, तर मार्गदर्शक शिक्षक- धनंजय लहामगे, संजय देशमुख, श्रीमती सोनवणे, श्रीमती राठोड, सीमा कोल्हाळ यांनी कठोर परिश्रम आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनातून मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करून कौतुक करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब बनकर, उपप्राचार्य दिपक बुऱ्हाडे, पर्यवेक्षक गोरख मालुंजकर, मार्गदर्शक शिक्षक व त्याचबरोबर सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले.

HAPPY Birthday

श्री. सचिन पवार
- संचालक -
पवार फ्लेक्स
दैनिक युवावार्ता

# लाडकी बहिणींना दिलासा

## अर्ज अपडेटसाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

मुंबई (वृत्तसंस्था) मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या राज्यातील लाखो महिलांसाठी दिलासादायक बातमी आहे. तांत्रिक चुकांमुळे ज्या महिलांना मिळणारा लाभ थांबला होता, त्यांना आपल्या अर्जात सुधारणा करण्यासाठी आता ३१ मार्च २०२६ पर्यंतची शेवटची संधी देण्यात आली आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे लाडकी बहीण योजनेच्या हप्त्यांपासून वंचित असलेल्या हजारो लाभार्थी महिलांना मोठा आधार मिळाला आहे. योजनेच्या सुरुवातीला अर्ज भरताना झालेल्या घाईगडबडीमुळे अनेक महिलांनी ई-केवायसी प्रक्रियेत चुकीचे पर्याय निवडले होते. विशेषतः 'नाही' ऐवजी 'हो' अशा तांत्रिक निवडीमुळे प्रणालीने अनेक पात्र अर्ज नाकारले होते. या तांत्रिक त्रुटी दूर करून माहिती अद्ययावत करण्यासाठी प्रशासनाने ही अंतिम मुदतवाढ दिली आहे.

ज्यांचे अर्ज मंजूर आहेत, पण खात्यात एकही रुपया जमा झालेला नाही.ज्यांच्या बँक खात्याच्या माहितीत त्रुटी आहेत. ज्यांनी अद्याप आधार कार्डचे प्रमाणीकरण पूर्ण केलेले नाही. ज्यांचे बँक खाते डीबीटी साठी लिंक किंवा सक्रिय नाही अशा लाभार्थी महिलांना अर्ज दुरुस्तीची संधी मिळणार आहे. नाव आणि तांत्रिक विसंगती दूर होणार अनेक महिलांच्या आधार कार्डवरील नाव आणि बँक पासबुकवरील नाव यात तफावत असल्याने त्यांचे हप्ते रखडले होते. आता ३१ मार्चपर्यंत ही दुरुस्ती केल्यास रखडलेल्या थकीत हप्त्यांसह पुढील सर्व लाभ महिलांच्या खात्यात जमा होणार आहेत.

जिल्हा प्रशासनाकडून सर्व पात्र लाभार्थी महिलांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी दिलेल्या मुदतीत आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी. ३१ मार्च २०२६ नंतर कोणत्याही प्रकारची मुदतवाढ दिली जाणार नाही, त्यामुळे तांत्रिक कारणास्तव लाभ बंद झालेल्या महिलांनी तातडीने आपली माहिती अपडेट करावी. येत्या काही दिवसांमध्ये फेब्रुवारीच्या हप्त्याची रक्कम लाडक्या बहिणींना दिली जाऊ शकते.

# सोशल मीडिया वापर बदलणार; KYC अनिवार्य करण्याचा प्रस्ताव चर्चेत

## संसदीय समितीची मोठी शिफारस



मुंबई (वृत्तसंस्था) सोशल मीडिया वापरासंदर्भात लवकरच मोठी अपडेट येण्याची शक्यता आहे. कारण संसदीय समितीच्या शिफारसी मान्य झाल्या, तर लवकरच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करण्यासाठी केवायसी अनिवार्य होऊ शकते. महिला आणि अल्पवयीन मुलांच्या सुरक्षिततेसाठी ही शिफारस करण्यात आली आहे. मागील काही काळापासून अल्पवयीन मुलांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मपासून दूर ठेवण्याबाबत चर्चा सुरू आहेत, त्या पार्श्वभूमीवर संसदीय समितीने गृह मंत्रालय आणि आयटी मंत्रालयाला ही महत्त्वाची शिफारस केली आहे.

संसदीय समितीच्या प्रस्तावानुसार सोशल मीडिया, डेटिंग प्स आणि गेमिंग प्लॅटफॉर्मवर केवायसी आधारित वापरकर्त्याची ओळख तसेच वयाची तपासणी करण्याबाबत यंत्रणा लागू करण्यास सांगण्यात आले आहे. ही शिफारस महिला सक्षमीकरणासंदर्भात संसदीय समितीने सायबर गुन्हे आणि महिलांची सायबर सुरक्षा विषयावर सादर केलेल्या अहवालाचा हा एक भाग आहे.

बनावट प्रोफाइलआणि अज्ञात पद्धतीने होणारा छळ यासारख्या समस्यांना आळा घालण्यासाठी सर्व डिजिटल प्लॅटफॉर्मवर अनिवार्य केवायसी पडताळणी असावी, या मुद्यावर समितीने जोर दिला आहे. समितीच्या अहवालात असे सुचवण्यात आले आहे का, कंपन्यांनी ठराविक अंतराने वापरकर्त्यांची पुन्हा पडताळणी करावी. ज्या खात्यांविरोधात वारंवार तक्रारी येतात, त्यांच्यावर विशेष नजर ठेवावी.

याशिवाय डेटिंग आणि गेमिंग प्ससाठी कडक लायसन्सिंग नियम आणि वय-पडताळणी प्रोटोकॉल तयार करण्याचीही मागणी आहे. जेणेकरून महिला आणि अल्पवयीन मुलांची फसवणूक किंवा शोषण होण्यापासून संरक्षण करता येईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्लॅटफॉर्मवर मोठा दंड आकारण्याचाही प्रस्ताव आहे. बनावट खात्यांमुळे सायबर स्टॉकिंग, ऑनलाइन छळ आणि संमतीशिवाय खासगी फोटो प्रसारित होण्याचे प्रमाण कसे वाढत आहे, हे समितीने आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे.

रिपोर्टनुसार सोशल मीडियावर ट्रोलिंग आणि ओळख चोरीच्या घटना आता सामान्य झाल्या आहेत. या घटना रोखण्यासाठी घधउ सोबतच तक्रारींच्या चौकशीसाठी एक सक्षम यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे. या उपायांमुळे एकीकडे डिजिटल प्लॅटफॉर्मचा गैरवापर कमी होईल आणि ओळख पटवणे सोपे होईल, पण दुसरीकडे यामुळे गोपनीयता आणि डेटा सुरक्षिततेवर वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

## संपादकीय...

# आयपीएलमधून घडतेय भारतीय संघाची नवी ताकद

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएल हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय आणि आर्थिकदृष्ट्या प्रबळ असा क्रिकेटचा महाकुंभ मानला जातो. एकोणिसाव्या हंगामाची सुरुवात २८ मार्चपासून होत असून पुढील काही आठवडे क्रिकेटप्रेमींसाठी खऱ्या अर्थाने पर्वणी ठरणार आहेत. २००८ साली सुरू झालेली ही स्पर्धा आज अठरा वर्षांची झाली असून या काळात क्रिकेटच्या खेळात आणि त्याच्या व्यवस्थापनात मोठे बदल घडून आले आहेत. बदलत्या काळातही आयपीएलची लोकप्रियता कमी झाली नाही, उलट ती अधिकाधिक वाढतच गेली आहे. जगभरातील प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या या स्पर्धेने क्रिकेटला केवळ खेळापुरते मर्यादित न ठेवता एक मोठा व्यवसाय आणि मनोरंजनाचा प्रभावी मंच बनवले आहे. आयपीएलच्या प्रवासात काही अडथळेही आले. मॅच फिक्सिंगसारख्या गंभीर प्रकरणांमुळे या स्पर्धेच्या प्रतिमेला धक्का बसला होता. काही खेळाडूंवर कायमस्वरूपी बंदी घालण्यात आली, तसेच चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स या संघांवर दोन वर्षांची बंदी घालण्यात आली होती. या घटनांमुळे आयपीएलची विश्वासार्हता धोक्यात येईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या कठोर भूमिकेमुळे आणि योग्य व्यवस्थापनामुळे ही स्पर्धा पुन्हा उभारी घेऊ शकली. त्यामुळे आयपीएलने आपली प्रतिमा पुन्हा मजबूत केली आणि जागतिक स्तरावर आपले स्थान अधिक भक्कम केले. कोरोना महामारीच्या काळात जगभरातील क्रीडा स्पर्धा ठप्प झाल्या होत्या. अशा कठीण परिस्थितीतही बीसीसीआयने आयपीएलचे आयोजन करून एक आदर्श निर्माण केला. कधी देशात तर कधी परदेशात, कधी प्रेक्षकांविना तर कधी मर्यादित प्रेक्षकांसह स्पर्धा पार पडली. या काळातही खेळाडूंना आणि चाहत्यांना क्रिकेटचा आनंद मिळत राहिला. आयपीएलच्या यशस्वी आयोजनामुळे बीसीसीआयने व्यवस्थापन कौशल्याचे उत्कृष्ट उदाहरण सादर केले. त्यामुळेच आयपीएल ही केवळ एक स्पर्धा न राहता एक जागतिक ब्रँड बनली आहे. सुरुवातीला आठ संघांसह सुरू झालेली ही स्पर्धा आता दहा संघांपर्यंत विस्तारली आहे. गुजरात टायटन्स आणि लखनौ सुपर जायंट्स या नव्या संघांच्या समावेशामुळे स्पर्धेत अधिक चुरस निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे गुजरात टायटन्स या संघाने पदार्पणातच विजेतेपद पटकावून सर्वांना आश्चर्यचकित केले. इतकेच नव्हे तर सलग दोन वर्षे अंतिम फेरीत प्रवेश करून या संघाने आपली ताकद दाखवून दिली आहे. यावरून संघ व्यवस्थापन, नियोजन आणि युवा खेळाडूंचा योग्य उपयोग याचे महत्त्व अधोरेखित होते. आयपीएलमध्ये काही संघांचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून येते. चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स या दोन संघांनी प्रत्येकी पाच वेळा विजेतेपद मिळवून आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. त्यानंतर कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांनी प्रत्येकी दोन वेळा विजेतेपद पटकावले आहे. राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांनी प्रत्येकी एकदा विजेतेपद मिळवले आहे. मागील वर्षी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघाने विजेतेपद मिळवून आपल्या चाहत्यांचा आनंद द्विगुणित केला. पंजाब, दिल्ली आणि लखनौ यांसारख्या संघांना अजूनही विजेतेपदाची प्रतीक्षा आहे. त्यामुळे यंदाच्या हंगामात कोणता संघ नव्याने इतिहास घडवतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या हंगामातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे अनेक संघांनी आपल्या कर्णधारांमध्ये बदल केले आहेत. मुंबई इंडियन्सने रोहित शर्माच्या जागी हार्दिक पांड्याला कर्णधारपद दिले आहे. चेन्नई सुपर किंग्जमध्ये महेंद्रसिंह धोनीने नेतृत्वाची जबाबदारी ऋतुराज गायकवाडकडे सोपवली आहे. गुजरात टायटन्सचे नेतृत्व शुभमन गिलकडे आहे. कोलकाता नाईट रायडर्सचे नेतृत्व अजिंक्य रहाणेकडे आहे, तर पंजाब किंग्जचे नेतृत्व श्रेयस अय्यरकडे आहे. लखनौ सुपर जायंट्सचे नेतृत्व ऋषभ पंतकडे असून दिल्ली संघाचे नेतृत्व अक्षर पटेल सांभाळत आहे. बंगळुरू संघाचे नेतृत्व रजत पाटीदारकडे, हैदराबादचे नेतृत्व ईशान किशनकडे आणि राजस्थानचे नेतृत्व रियान परागकडे आहे. या नव्या नेतृत्वामुळे संघांमध्ये नवा उत्साह आणि ऊर्जा निर्माण झाली आहे. आयपीएल ही केवळ एक स्पर्धा नसून ती युवा खेळाडूंसाठी संधीचे दार आहे. भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी आयपीएल हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. सूर्यकुमार यादव, रवींद्र जडेजा, शुभमन गिल, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, युजवेंद्र चहल, वॉशिंग्टन सुंदर, मोहम्मद सिराज, संजू सॅमसन, ईशान किशन, वरुण चक्रवर्ती, अभिषेक शर्मा आणि ऋषभ पंत यांसारखे अनेक खेळाडू आयपीएलमधूनच पुढे आले आहेत.

CorelDRAW
Ps
Ai
Id
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

# निमा नाशिकमध्ये नवीन कार्यकारिणी जाहीर

## आशिष नहार अध्यक्षपदी, विविध समित्यांची निवड



नाशिक (युवावार्ता प्रतिनिधी)- निमा नाशिक (नाशिक इंडस्ट्रीज मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन) ही सुमारे १६ हजार उद्योजकांचे प्रतिनिधित्व करणारी महत्त्वाची औद्योगिक संस्था असून, उद्योगांचे प्रश्न शासनदरबारी मांडणे, उद्योजकांना आवश्यक सहाय्य करणे तसेच उद्योगवाढीसाठी देश-विदेशात प्रयत्न करणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

संस्थेच्या पुढील वर्षासाठी अध्यक्षपदी श्री. आशिष नहार यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विविध उपसमित्या गठीत करण्यात आल्या असून, त्यामध्ये उद्योग आणि संस्था समन्वय समितीच्या अध्यक्षपदी (चेअरमन) नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीचे पत्र नाशिक विभागाचे इन्स्पेक्टर जनरल श्री. दत्तात्रय कराळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी निमा नाशिकच्या कार्यकारिणी सदस्यांची उपस्थिती होती. तसेच संस्थेच्या विविध समित्यांच्या अध्यक्षांनाही याच वेळी नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. दरम्यान, मासिक बैठकीत अध्यक्ष आशिष नहार यांनी विविध समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला आणि आगामी कार्ययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

नवीन कार्यकारिणीमुळे निमा नाशिकच्या औद्योगिक उपक्रमांना अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

# संजय दौलतराव देशमुख यांचे निधन



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)- अकोले तालुक्यातील सुगाव बु. येथील ज्येष्ठ नागरिक संजय दौलतराव देशमुख यांचे बुधवार, दिनांक २५ मार्च रोजी सकाळी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्यावर बुधवारी रात्री सुगाव बु. येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

कै. संजय देशमुख हे बँक अधिकारी होते. हसतमुख व्यक्तिमत्त्वाचे ते धनी होते. त्यांच्या पश्चात आई कमल देशमुख, पत्नी रुपाली देशमुख, मुलगा पृथ्वीराज देशमुख, दोन बहिणी असा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. संजय देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

READ E- NEWS ON
Yuvavarta.in

## महाराष्ट्र शासन

### सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

### उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर

यांचे कार्यालय, यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन, तिसरा मजला, नवीन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर

ई-मेल आय डी -: dr_sangmner@rediffmail.com

सत्यमेव जयते

जा.क्र वि-१/बारामती बँक/जाहीर समन्स/कलम १०१/सन २०२६ दिनांक २५/०३/२०२६

### -: जाहीर समन्स नोटीस :-

ज्याअर्थी वादी दि बारामती सहकारी बँक लि. बारामती, शाखा संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांनी जाबदार यांचे विरुध्द या कार्यालयात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्रमाणपत्र मिळणे कामी दावा दाखल केला आहे व वसुली प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

ज्याअर्थी जाबदार यांना यापुर्वी या कार्यालयाने दिनांक १६/२/२०२६ रोजीच्या नोटीसीद्वारे दिनांक ६/३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयात हजर रहावे व बँकेने दाखल केलेल्या दाव्यामध्ये तुमचे लेखी तोंडी म्हणणे मांडावे असे कळले आहे, परंतु सदर दिवशी जाबदार सुनावणीस उपस्थित राहीले नाही.

त्याअर्थी खाली नमुद जाबदार यांना नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने पुन्हा नोटीस देण्यात येते की, आपण वार मंगळवार दिनांक ७/४/२०२६ रोजी सकाळी. ११.०० वाजता उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर, यशवंतराव चव्हाण प्रशाकिय भवन, तिसरा मजला, नविन नगर रोड, संगमनेर या कार्यालयात सदर दाव्यामध्ये लेखी तोंडी म्हणणे देणे कामी हजर राहावे. सदर दिवसी व वेळेत आपण हजर न राहील्यास अथवा लेखी म्हणणे आपण सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

| अ. क्र. | दावा क्रमांक | प्रतीवादी (कर्जदार व जामिनदार) | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २५/२०२६ | १. कर्जदार: श्री. मे. स्वामिनी डेअरी फार्म. प्रो.प्रा. सौ. रेश्मा किरण तोरकडी मु.पो. धांदरफळ बु. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>२. जामिनदार : सौ. अनिता शंकर गोर्डे छत्रपती मिल्क, मु.पो. धांदरफळ बु. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदार: श्री. मिक्रम शांताराम कानवडे मु.पो. वडगांव लांडगा, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>४. जामिनदार: श्री. रामनाथ सखाराम तोरकडी मु.पो. धांदरफळ बु., ता. संगमनेर जि. अहिल्यानगर | ९,४३,८९३.८८/- |

ही नोटीस आज दिनांक २५/०३/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिली आहे.

(संतोष कोरे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, संगमनेर

दिक्षा
28 मार्च
संजय आहिरे
हिस वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा !
- शुभेच्छूक -
आहिरे परीवार, पवार परीवार
दैनिक युवावार्ता परीवार, संगमनेर



We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. डॉ. वाबळे नवनाथ लहानु, रा. तुळशी मार्केट, नविन नगर रोड, संगमनेर, म्यु.घ.नं. -, सि. स. नं. - स. नं. १५१/१८६ या ठिकाणी मध्ये ओम साई भुषण नर्सिंग होम चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. २५/०२/२०२६ मुख्याधिकारी - संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

# चाळीस आमदार खरातला भेटले मग मलाच टार्गेट का - केसरकर

मुंबई (वार्ताहर)- भोंदू अशोक खरातला तब्बल ३९ आमदार भेटून गेले, मग माझेच नाव का घेतले जाते? मी फक्त एकदाच ईशान्येश्वर मंदिरात पूजा केली. त्यामुळे केवळ ओळख असल्यामुळे एका व्यक्तीविषयी काहीतरी बोलणे साफ चुकीचे आहे, अशा शब्दांत सत्ताधारी शिवसेनेचे नेते तथा माजी मंत्री दीपक केसरकर यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

दीपक केसरकर यांना भोंदू अशोक खरातशी असणाऱ्या त्यांच्या संबंधांवरून टीकेला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर दीपक केसरकर यांनी उपरोक्त शब्दांत स्पष्टीकरण देत आपला संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, मी देवभक्त आहे.

मी न चुकता शिर्डीला येतो. ते जे ईशान्येश्वर मंदिर आहे, ते शिर्डीच्या येण्याच्या रस्त्यात आहे. मी लहान असल्यापासून दर सोमवारी दर्शनासाठी शिव मंदिरात जातो. शिर्डीला आल्यानंतर कोणत्या महादेव मंदिरात जायचे? तर मग ईशान्येश्वर मंदिरात जाणे झाले. त्या निमित्ताने अशोक खरातशी ओळख झाली.

आता ओळख झाली म्हणजे त्याच्या कोणत्याही कृत्यामध्ये माझा सहभाग आहे असे नाही. त्याला वाचवण्यासाठी माझा एखादा फोन गेला असेल, तर मी दोषी आहे. पण त्याच्याकडून जे चुकीचे कृत्य घडले आहे, त्यासाठी त्याला शिक्षा झालीच पाहिजे, ही माझी स्पष्ट भूमिका आहे.

हेल्पर पाहिजे
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी ड्रायव्हर बरोबर कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

त्वरित पाहिजेत
द्वारकादास शामकुमार
सेल्समन
कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर
सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ १२ ते ९
9511238422

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

बंगला भाड्याने पाहिजे
2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्त्वावर त्वरीत पाहिजे
- संपर्क -
9503626111
9272165050

पाहिजेत
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

पाहिजेत
मार्केटिंगसाठी कॉम्प्युटर्सची माहिती असलेले मुले पाहिजेत
पोर्णिमा एजन्सी
नगरपालिकेजवळ, सारिका ड्रेसेस समोर, संगमनेर
7588607008
9890636830

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

डेटा एंट्री ऑपरेटर पाहिजे
पात्रता: संगणक ज्ञान व MS Excel / Google Sheets मध्ये काम करता येणे आवश्यक.
अनुभव असल्यास प्राधान्य.
वेळ: सकाळी 9 ते संध्याकाळी 6
पगार: चर्चेनुसार / अनुभवाप्रमाणे
पत्ता: मे. एन. के. गाडे ऑफिस, पहिला मजला , गाडे बिल्डिंग, आशिर्वाद पतसंस्थेजवळ, शिवाजीनगर, संगमनेर
9822684402

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी




MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
■ प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
■ वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
■ सर्वांसाठी भोजन व्यवस्था
सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

# अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था संगमनेर शाखेतर्फे बाहुली नाट्याचे आयोजन

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
बाहुली नाट्य - पपेट शो हा लहान मुलांसह सर्वांच्याच आवडीचा, उत्सुकतेचा व आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो. मुलांचे कुतूहल जागृत करून भावी पिढीवर सुसंस्कार करण्यासाठी अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, संगमनेर तर्फे सर्वांसाठी खुला व मोफत मनोरंजनाचा आगळा वेगळा बोलक्या बाहुल्या हा कार्यक्रम शनिवार दि. २८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता के. बी. दादा देशमुख सभागृह, सह्याद्री कॉलेज, पुणे-नाशिक रोड, संगमनेर येथे होत असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी व अध्यक्ष अनिल देशपांडे यांनी दिली आहे.

या नाट्य, बाहुली नृत्य व इतर रंजक कार्यक्रमाचे सादरीकरण श्रीमती संगीता पुंडगे करणार असून संस्थेच्या सन्माननीय अध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत कथाकथन उपक्रमात सहभागी असणारे कार्यकर्ते व विद्यालयांतील मुख्याध्यापकांचा गौरव करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमास आपल्या कुटुंबियांसह सहभागी होण्याचे तसेच संस्थेचे सदस्य होण्यासाठी अनिल देशपांडे यांच्याकडे ८९८३७७१२७५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन उपाध्यक्ष डॉ. विवेक वाकचौरे, कार्याध्यक्ष अरविंद गाडेकर आणि संस्थेचे सचिव दर्शन जोशी यांनी सर्व संगमनेरकरांना केले आहे.

# अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या सात विद्यार्थ्यांची ए. आर. इन्फोटेकमध्ये निवड

अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-
अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या अगस्ती इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन ॲण्ड रिसर्च, एकूण सात विद्यार्थ्यांची निवड ए. आर. इन्फोटेक या कंपनीत फुल स्टॅक डेव्हलपर प्रशिक्षणार्थी म्हणून नुकतीच निवड करण्यात आली आहे. मुलाखतीत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत ही निवड मिळवली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कु. कुटे गायत्री, ढोकणे गायत्री, कासार साक्षी, काळे कल्याणी, म्हस्के ईश्वरी, जाधव महेंद्र, कानवडे अभिषेक या विद्यार्थ्यांची निवड झाली.

तसेच , या अगोदर टी. सी. एस. कंपनीत बी. पी. ओ. मध्ये तीस विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली. या सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट तयारी, प्रगल्भ आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले असून त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांच्या मेहनत, तयारी आणि आत्मविश्वासाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# बिबट्यापासून संरक्षणासाठी पालकांनी केली उपाययोजना



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
नांदूरी दुमाला येथील हनुमान मळा येथे जिल्हा परिषद शाळेच्या पालकांनी बिबट्यापासून विद्यार्थ्यांचे संरक्षण करण्यासाठी संरक्षण भिंतीवर अजून दुप्पट उंचीची तारेची जाळी उभी केली. त्यामुळे शाळेच्या मैदानात विद्यार्थी निर्भयपणे बागडत आहेत.

हनुमान मुळा शाळेचे क्षेत्र हे बिबटप्रवण क्षेत्र आहे. शाळेला संरक्षण भिंत आहे. मात्र ज्या बाजूला शेती आहे, तिकडून वाघ अगदी सहज उडी मारून मैदानात येऊ शकतो. एक-दोनदा शालेय वेळेव्यतिरिक्त अशी घटना घडलेली आहे. विद्यार्थ्यांच्या जिवितास असलेला धोका ओळखून शाळा व्यवस्थापन समितीने तात्काळ पालकांच्या लोकवर्गणीतून शाळेच्या संरक्षण भिंतीची उंची वाढवली. त्यासाठी संरक्षण भिंतीवर भक्कम अशी तारेची जाळी बसवली व शालेय आवार भयमुक्त केले.

या कामी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ कदम, उपाध्यक्ष ज्ञानदेव कवडे, सर्व सदस्य तसेच सर्व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्याबद्दल शाळेच्यावतीने मुख्याध्यापक भाऊसाहेब कोटकर व शिक्षिका सुवर्णा गोडसे मॅडम यांनी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

# मी शंकर, तू माझी पार्वती; अत्याचार प्रकरणी आणखी एक महाराज होणार गजाआड



पुणे
(युवावार्ता प्रतिनिधी)-
राज्यात एकीकडे अशोक खरात प्रकरण चर्चेत असताना, आरोपी खरातची एसआयटी चौकशी सुरू असतानाच आता आणखी एका भोंदू बाबाचा पर्दाफाश झाला आहे. 'मी शंकर असून तू माझी पार्वती आहे, असे सांगून एका महिलेवर बलात्कार करणाऱ्या वसईतील स्वयंघोषित धर्मगुरू ऋषिकेश वैद्य याच्याविरोधात वसईच्या माणिकपूर पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे. पुढील कारवाईसाठी हे प्रकरण पुण्यातील मांजरी पोलिसांकडे वर्ग करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला ३५ वर्षांची असून पुण्यात राहते. तिने माणिकपूर पोलिसांना दिलेल्या फिर्यादीनुसार २०२३ मध्ये तिची ओळख वसईतील स्वयंघोषित धर्मगुरू आणि आमची वसई या संस्थेचा प्रमुख ऋषिकेश वैद्य याच्याशी फेसबुकवर झाली. त्याने पीडित महिलेच्या धार्मिक वृत्तीचा फायदा घेत अध्यात्म शिकविण्याच्या बहाण्याने जवळीक साधली. डिसेंबर २०२३ मध्ये तो तिला भेटायला पुण्यात गेला. मी महादेवाचा अवतार आहे, तू माझी पार्वती आहेस असे सांगून तिला भुलवले. त्यानंतर तिला पुण्यातील मांजरी येथील एका लॉजमध्ये नेले आणि तिला गुंगीकारक पदार्थ देऊन तिच्यावर अत्याचार केला. या काळात वैद्य याने तिच्या नकळत तिचे अश्लील छायाचित्रे काढली होती.

या छायाचित्रांच्या आधारे तिला ब्लॅकमेल करून पुन्हा भेटायला बोलावले. मे २०२५ मध्ये वसईतील हॉटेल एक्सप्रेस इनमध्ये पीडित महिलेला भेटायला बोलावून तिच्यावर पुन्हा अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, नाशिकच्या अशोक खरात याचे प्रकरण बाहेर आल्यानंतर पीडित महिलेने हिम्मत दाखवून आपल्या पतीला हा प्रकार सांगितला आणि त्यांनी बुधवारी संध्याकाळी वसईच्या माणिकपूर पोलीस ठाण्यात ऋषिकेश वैद्य याच्या विरोधात तक्रार दाखल केली. बलात्काराची पहिली घटना पुण्यात घडली असल्याने हे प्रकरण पुण्यातील मांजरी पोलीस ठाण्यात वर्ग केल्याची माहिती माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिरालाल जाधव यांनी दिली. दरम्यान, ऋषिकेश वैद्य याने धर्मगुरू असल्याचे भासवून अनेक मुलींना आपल्या जाळ्यात ओढून त्यांचे लैंगिक शोषण केल्याचे पीडित महिलेने सांगितले आहे. याप्रकरणी, पोलीस अधिक तपास करत आहेत.

# चाकणकर व झिरवाळांच्या प्रकरणी उपमुख्यमंत्री पवार गप्प का - सपकाळ



मुंबई (वार्ताहर)-
भोंदूबाबा अशोक खरातच्या अनैतिक दरबारात हजेरी लावणाऱ्या महायुती सरकारमधील डझनभर मंत्र्यांच्या अश्लील व अश्लाघ्य कारनाम्याने महाराष्ट्राची पुरती नाचक्की झालेली असताना राज्याचे अन्न व औषधी प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होणे हे महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतिक अध:पतनाचे ज्वलंत उदाहरण आहे. सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन नरहरी झिरवाळांची मंत्रिपदावरून तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, एका जबाबदार लोकप्रतिनिधी आणि मंत्र्यांने अशा प्रकारचे अश्लील आणि अनैतिक वर्तन करणे अत्यंत संतापजनक आणि निषेधार्ह आहे. हा प्रकार केवळ व्यक्तीगत मर्यादांचा भंग नाही, तर सार्वजनिक जीवनातील नैतिकतेलाच काळिमा फासणारा आहे. जनतेच्या विश्वासावर निवडून आलेल्या मंत्र्याने किमान नैतिकतेची चौकट तरी पाळावी, ही साधी अपेक्षा असते. मात्र, मंत्री नरहरी झिरवाळ यांचा व्हिडिओ पाहता त्या अपेक्षांचा पूर्णपणे भंग झाल्याचे स्पष्ट होते. झिरवळांच्या मंत्रालयातील कार्यालयात दिवसाढवळ्या लाच घेताना कर्मचारींना अटक केल्याचे प्रकरणही ताजे आहे, त्यावेळी क्लार्कवर कारवाई करण्यात आली. नरहरी झिरवाळ यांच्या भोळ्या चेहऱ्यामागे खूप काही दडलेले आहे असे दिसते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोणताही विलंब न करता नरहरी झिरवाळ यांना मंत्रिमंडळातून बाहेरचा रस्ता दाखवावा.

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात डझनभर मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांचा सहभाग आहेच, पण सर्वात लाजीरवाणी बाब म्हणजे महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या भोंदूबाबाशी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांचेच घनिष्ट संबंध असावेत हे अत्यंत लांछनास्पद आहे. चाकणकरांना राजीनामा द्यावा लागला असला तरी त्यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीचे अध्यक्षपद अद्याप कायम आहे. चाकणकर यांच्यानंतर नरहरी झिरवाळांचा प्रताप समोर आला आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मात्र यावर काहीही भाष्य केलेले नाही. सुनेत्रा पवार यांनी या दोघांनाही सर्व पदावरून मुक्त करावे, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# अमृतवाहिनी पॉलिटेक्निकच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचे धमाकेदार सादरीकरण



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
छत्रपती संभाजी महाराज यांची गौरवगाथा, दक्षिणात्य कथ्थक नृत्य, विविध फ्युजन साँग, महाराष्ट्राची संस्कृती दाखवणारे नृत्य अशा विविध कलाविष्कारांनी अमृतवाहिनी पॉलिटेक्निकचा जल्लोष २०२६ हा वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहाने झाला असून यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी अत्यंत धमाकेदार सादरीकरण केले. तर महाविद्यालयीन जीवन हा प्रत्येकाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असल्याचे प्रतिपादन माजी शिक्षणमंत्री तथा काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

अमृतवाहिनी पॉलिटेक्निकच्या वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी मा. शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात, प्राचार्य प्रा. व्ही. बी. धुमाळ, उपप्राचार्य प्रा. जी. बी. काळे, समन्वयक व विभाग प्रमुख प्रा. मिलिंद इंगोले, प्रा. नवनाथ शिंदे, प्रा. नीलिमा चौधरी, प्रा. जे. के. सातपुते, प्रा. मनीष सातपुते, प्रा. एस. व्ही. गायकवाड, प्रा. अशोक वाळे, प्रा. अक्षय वर्पे यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अमृतवाहिनीच्या ॲंफी थिएटर मध्ये जल्लोष २०२६ या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक गणेश वंदनाने झाली. यानंतर हिंदी मराठी गीतांवरील विविध सामूहिक नृत्याने कार्यक्रमात रंगत आणली. छत्रपती संभाजी महाराज यांची गौरवगाथा ने सर्वांच्या अंगावर शहारे आणले, तर दक्षिणात्य कथ्थक नृत्याने उपस्थितांच्या डोळ्यांची पारणे फेडली. यामधील मुलांचा व मुलींचा सहभाग, मधून मधून होणारा टाळ्यांचा गजर, उत्कृष्ट संयोजन, नियोजन आणि शिस्तबद्ध झालेला कार्यक्रम हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. यावेळी अमृतवाहिनी संस्थेतील विद्यार्थ्यांनी गायलेले, लिहिलेले व संगीतबद्ध केलेले अमृतवाहिनी शिक्षण संस्थेवरील गीताचे लॉन्चिंग करण्यात आले.

यावेळी शुभेच्छा देताना मा. शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, प्रत्येकाच्या जीवनामध्ये महाविद्यालयीन कालावधी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. अभ्यास, संशोधन महत्त्वाचे आहेत, पण परिपूर्ण जीवनासाठी कला व सांस्कृतिक छंदही जोपासले पाहिजे. अमृतवाहिनी संस्थेचे अनेक माजी विद्यार्थी देशात आणि विदेशात चांगल्या पदावर काम करत असून हे आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना संधी दिली जात आहे. संधी मिळाली तर ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी पुढे जात आहेत. चांगला अभ्यास करा, यशस्वी व्हा, हा कालखंड प्रत्येकाच्या जीवनात कायम स्मरणात राहणारा असून जीवनाला दिशा देणारा असल्याचे ते म्हणाले.

प्राचार्य व्ही. बी. धुमाळ म्हणाले की, गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याबरोबर विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून सातत्याने काम केले जात आहे. अमृतवाहिनीच्या अनेक विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमधून मोठी मागणी असून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व परिपूर्ण करण्यासाठी विविध उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जात असल्याचे ते म्हणाले. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा सक्रिय सहभाग आणि उपस्थिती लक्षणीय होती.

वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने अमृतवाहिनी तंत्रनिकेतन मध्ये अमृत फेस्ट ही टेक्निकल प्रोजेक्ट स्पर्धा संपन्न झाली. यामध्ये छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, उत्तर महाराष्ट्र या विविध जिल्ह्यांमधून २२६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. नवनवीन संशोधनपर प्रोजेक्ट यामध्ये दाखल झाले असून यातून विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन मिळेल असे संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख यांनी म्हटले आहे.

# वृंदावन कॉलनीत श्रीराम नवमी उत्साहात

## भक्ती, संस्कृती आणि बालकलेचा सुंदर संगम



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
चैत्र महिना म्हणजे चैतन्य, नवऊर्जा आणि नवसृजनाचा मंगल आरंभ मानला जातो. पानगळ संपून निसर्ग नव्या पालवीने बहरतो आणि वसंत ऋतूच्या आगमनाने सृष्टीत आनंदाची लहर पसरते. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या नववर्षाच्या या पवित्र कालखंडात चैत्र नवरात्राचे नऊ दिवस भक्तिभावाने साजरे होत असताना प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव, म्हणजेच रामनवमी, विशेष उत्साहात साजरी केली जाते.

या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी येथील लक्ष्मीनगर येथील वृंदावन कॉलनीत बालचम्मुनीं गुढी उभारून श्रीरामनवमी साजरी केली. चैत्राच्या मंगल प्रारंभी या बालचम्मुनीं संस्कृतीचा अनोखा वारसा जपला. स्वरा म्हाळणकर, रिद्धी सिद्धी या जुळ्या भगिनी आणि त्यांचा लहान भाऊ मयंक म्हाळणकर यांनी आपल्या निरागस सहभागातून या सणाला विशेष रंगत आणली.

लहान बालकांनी चैत्रांगणाची आकर्षक रांगोळी काढली. यामध्ये हिंदू धर्माचे प्रतीक श्री, स्वस्तिक, ओम, त्रिशूल, भगवाध्वज, कासव, लक्ष्मीची पावले, हत्ती, तुळशी वृंदावन, कलश, सरस्वती तसेच श्रीरामांच्या मूर्तीचे पूजन करून वातावरण भक्तिमय केले. चौरंगावर सुंदर सजवलेली गुढी उभारून सुवासिनींचे अलंकार, सवाष्ण वाण ठेवत प्रभू श्रीरामचंद्र आणि गुढीला नैवेद्य दाखवून पारंपरिक पद्धतीने सण साजरा करण्यात आला.

बालगोपालांनी अत्यंत कलाकुसरीने साकारलेली रांगोळी आणि सजावट पाहून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. लहान वयातच संस्कारांची बीजे रोवणारा हा उपक्रम उपस्थितांच्या कौतुकास पात्र ठरला. सदर बालकांनी धर्मध्वज उंचावत, संस्कृतीची जोपासना आणि एकोप्याचा संदेशच यातून दिला.

# शेतकऱ्यांच्या रस्त्यांसाठी सरकारचा कडक निर्णय

## अतिक्रमण करणाऱ्यांना मोठा दणका - चंद्रशेखर बावनकुळे



मुंबई (वृत्तसंस्था)
राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीमालाची वाहतूक सुलभ करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना संदर्भात महसूल व वन विभागामार्फत महत्त्वपूर्ण शासन शुद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यापूर्वी दिनांक १४ डिसेंबर २०२५, ०७ जानेवारी २०२६ आणि १८ फेब्रुवारी २०२६ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयांमध्ये काही सुधारणा करण्यात आल्या असून शेतरस्ते अडवणाऱ्यांना थेट ५ वर्षे सरकारी योजनांसाठी अपात्र करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे

मुख्यमंत्री बळीराजा शेत आणि पाणंद रस्ते योजनेत महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या असून शेतरस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या किंवा रस्त्याचे नुकसान करणाऱ्यांचे आधार कार्ड आणि फार्मर आयडी तब्बल ५ वर्षांसाठी ब्लॉक करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरुन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून यासंदर्भातील शासन निर्णय देखील जारी करण्यात आला आहे. त्यामुळे, शेतरस्ते अडवणाऱ्या किंवा वाद घालणाऱ्यांना आता काळजी घ्यावी लागेल.

पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण ७ दिवसांत हटविण्याचे आदेश देण्यात येतील. अतिक्रमण न काढल्यास प्रशासनाकडून ते हटविले जाईल. तसेच, इतर शेतकऱ्यांच्या ये-जा हक्काच्या रस्त्यावर शेती करता येणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे आधार व फार्मर आयडी ५ वर्षांसाठी ब्लॉक करण्यात येतील आणि शासनाच्या योजनांपासून अपात्र ठरविण्यात येईल.

या योजनेसाठी कोणतेही भूसंपादन केले जाणार नाही. शेतकरी स्वेच्छेने जमीन देऊ शकतात, परंतु त्यासाठी नोंदणीकृत दानपत्र/हक्कसोड आवश्यक राहील. दिलेली जमीन परत मागण्याचा हक्क राहणार नाही. या नोंदणीसाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क माफ करण्यात आले आहे.

विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये ५ शेतकऱ्यांची निवड करण्याचे अधिकार संबंधित आमदारांना देण्यात आले आहेत. कंत्राटदारांची निवड पारदर्शक पद्धतीने करून पात्र कंत्राटदारांचे पॅनेल तयार केले जाईल. एकापेक्षा अधिक कंत्राटदारांना समान प्रमाणात काम वाटप करता येईल. कामाच्या रकमेच्या २% किंवा किमान रु.१५ लाख इतकी सुरक्षा ठेव अनिवार्य राहील. कंत्राटदाराकडे आवश्यक यंत्रसामग्री स्वतःच्या मालकीची असणे बंधनकारक करण्यात आले आहे. संबंधित कायद्यांनुसार दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे.

# हुंडाबळी: सामाजिक विकृती आणि गंभीर गुन्हा – सर्वोच्च न्यायालय



मुंबई (वृत्तसंस्था)
हुंड्यासाठी होणारे मृत्यू हा समाजाला लागलेला एक अतिशय गंभीर कलंक असून, कायद्याने बंदी असूनही केवळ पैशांच्या हव्यासापोटी हजारो महिलांचा अनैसर्गिक मृत्यू होत आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. हुंडाबळी प्रकरणातील आरोपीला पाटणा उच्च न्यायालयाने मंजूर केलेला जामीन रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाने हे ताशेरे ओढले आहेत.न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला व न्या. विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने म्हटले, हुंडाबळीसारख्या अत्यंत गंभीर गुन्ह्यात जामीन देताना उच्च न्यायालयाने अधिक सावधगिरी बाळगायला हवी होती. आरोपी कोठडीत आहे व आतापर्यंत केवळ दोन साक्षीदारांची तपासणी झाली आहे, या एकाच कारणावरून जामीन देणे पूर्णपणे असमर्थनीय आहे.मानवाधिकारांचे गंभीर उल्लंघनन्यायालयाने आपल्या निरीक्षणात म्हटले आहे की, ड़हुंडाबळी ही केवळ एक सामाजिक विकृती नसून ती मानवाधिकार व मानवी प्रतिष्ठेचे गंभीर उल्लंघन आहे. अनेकदा सासरच्या मंडळींकडून पैशांच्या किंवा वस्तूंच्या हव्यासापोटी महिलांची हत्या केली जाते वा आत्महत्येस प्रवृत्त केले जाते. ही प्रथा थांबवणे काळाची गरज आहे.ड़अहवालाकडे दुर्लक्षसंबंधित महिला आणि आरोपीचा विवाह होऊन दीड वर्षच झाले होते. १ सप्टेंबर २०२४ रोजी सासरच्या घरात संशयास्पद परिस्थितीत तिचा मृत्यू झाला होता. आरोपीच्या वकिलांनी असा दावा केला होता की, पीडित महिला मानसिकदृष्ट्या स्थिर नव्हती व तिने सहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. मात्र, शवविच्छेदन अहवालात महिलेच्या शरीरावर अंतर्गत आणि बाह्य अशा अनेक जखमा असल्याचे समोर आले. तसेच डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे तिचा मृत्यू झाला होता.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................... 05
सेल्सगर्ल.................... 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........................ 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# कुंभमेळानिमित्त संगमनेरच्या विकासाला गती

## १७ कोटींच्या रस्ते कामांना मंजुरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा लक्षात घेता प्रशासनाने विकासकामांना मोठी चालना दिली असून, संगमनेर तालुक्यासाठी ही मोठी संधी ठरणार आहे. दि. ३० जानेवारी २०२६ रोजी झालेल्या नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीत संगमनेरमार्गे शिर्डीला जोडणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांना तब्बल ९७.२५ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी देण्यात आली.

ही बैठक प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला. संगमनेरला जोडणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्यांचा समावेश या मंजुरीमध्ये संगमनेर तालुक्यातील निळवंडे-कौठे कमळेश्वर, वडगावपान, निळवंडे आणि संगमनेर-वडगावपान या प्रमुख मार्गांचा समावेश आहे. हे रस्ते सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून, पुणे-शिर्डी मार्गावरील वाढत्या वाहतुकीमुळे पर्यायी मार्ग म्हणून त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेरचे कार्यकारी अभियंता यांनी सादरीकरणाद्वारे या रस्त्यांची बिकट स्थिती आणि दुरुस्तीची तातडीची गरज अधोरेखित केली. यानंतर प्राधिकरणाने सर्वानुमते निधीला मंजुरी दिली. कुंभमेळा काळात नाशिक आणि शिर्डी येथे भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. याचा थेट फायदा संगमनेरला होणार असून, रस्ते सुधारल्यामुळे वाहतूक सुलभ होणार, व्यापार वाढणार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

स्थानिकांसाठी दिलासा- दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या रस्त्यांच्या कामांना अखेर मंजुरी मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. या कामांमुळे केवळ कुंभमेळ्याच नव्हे, तर भविष्यातील दळणवळण व्यवस्थेलाही मोठा हातभार लागणार आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने घेतलेला हा निर्णय संगमनेरच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असून, धार्मिक पर्यटनासोबतच पायाभूत सुविधांमध्येही मोठी सुधारणा घडवून आणणार आहे.

# निमगाव जाळीचे सरपंचपद अबाधित

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राजकीय दृष्ट्या महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या निमगाव जाळीचे लोकनियुक्त सरपंच प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांच्या विरोधात अतिक्रमणाचे दाखल केलेले अपील नाशिक आयुक्त कार्यालयाने फेटाळून लावले.

आश्वी जिल्हा परिषद गटामधील सर्वात मोठी निमगावजाळी ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाते. या ग्रामपंचायत ची निवडणूक सन २०२२-२०२३ मध्ये पार पडली होती. या निवडणुकीत लोकनियुक्त सरपंच म्हणून सौ प्रतिभा सोमनाथ जोंधळे हया प्रचंड बहुमताने निवडून आल्या आहेत. सरपंच सौ प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांनी निमगाव जाळी गावातील तुळजाभवानी दुध संस्थेने अतिक्रमण केले आहे अशी तक्रार सदस्य सुरेश दगडू डेंगळे याने अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज क्र. ८२/२०२३ अपील दाखल केले होते.

अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांनी दि.२०/०१/२०२५ रोजी सरपंच सौ प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांच्या बाजूने निकाल देऊन सुरेश डेंगळे याचा अर्ज नामंजूर करून अपील फेटाळले होते. त्यानंतर सुरेश डेंगळे याने अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाचे विरोधात नाशिक अप्पर विभागीय आयुक्तांकडे ग्रामपंचायत अपील क्र. २९/२०२५ दाखल केले होते. तक्रारदार सुरेश डेंगळे अप्पर विभागीय आयुक्तांपुढे निमगाव जाळी येथील तुळजाभवानी सह दुध उत्पादक संस्था संगमनेर लोणी रोड कडून निमगाव जाळी कडे येणाऱ्या गावठाण रोड च्या बाजूला असलेल्या सरकारी जागेमध्ये ग्रामपंचायत ची कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता अनधिकृतरित्या संस्थेचे बांधकाम केले आहे. आणि संस्थेची संस्थापक संचालक प्रतिभा सोमनाथ जोंधळे असल्याने त्यांना सरपंच पदावरून हटवण्यात यावे अशी तक्रारीत म्हटले होते. परंतु प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांनी संस्थेची सर्व कागदपत्रांची पूर्तता असल्याचे विभागीय अप्पर आयुक्त यांना पुराव्यानिशी सादर करून विभागीय अप्पर आयुक्त अजय मोरे यांनी दोन्ही बाजूचा व्यक्तिवाद एकूण घेऊन तक्रारदार ह्याच्या म्हणण्यानुसार सौ प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांनी ग्रामपंचायतीचे मिळकतीत अतिक्रमण केले असलेबाबत ग्रामपंचायत रेकॉर्डवर तशी नोंद नाही. तसेच प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांनी अतिक्रमण केले बाबत तक्रारदार याने सबळ पुराव्यानिशी शिध्द करू शकले नाही. त्यामुळे सुरेश डेंगळे याचे अपील नामंजूर करून अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांनी अपील क्र. ८२/२०२३ मधील दि. २०/०१/२०२५ रोजी पारित केलेला आदेश कायम करण्यात येत आहे असा निर्णय देऊन तक्रारदार याचा अपील फेटाळले.

# इराणने दिली भारताला साथ, थेट इंधन व्यापाराला सुरूवात

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

इराण आणि अमेरिका युद्ध सुरू आहे. ६ एप्रिलपर्यंत अमेरिकेने युद्धबंदीची घोषणा केली. इराण आणि अमेरिका युद्धाला सुरूवात झाल्यानंतर जागतिक बाजारात तेलाच्या किमतीमध्ये मोठी वाढ झाली. या तेलाच्या किमती नियंत्रणात आणण्याकरिता रशियासोबतच इराणवर लावलेले निर्बंध अमेरिकेने ३० दिवसांकरिता उठवले. काही वर्षांपासून अमेरिकेने इराणच्या तेलावर आणि गॅसवर काही निर्बंध लावले. त्यापूर्वी भारत आणि इराण यांच्यात इंधन व्यापार होत पण अमेरिकेने लावलेल्या निर्बंधांनंतर व्यापार ठप्प झाला होता. अमेरिका या युद्धात मागे पडली आहे. इराणकडून होर्मुज मार्ग बंद करण्यात आल्याने अमेरिकेवरील दबाव वाढला. शिवाय अनेक देश युद्धात भरडली जात आहेत. आखाती देश अमेरिकेवर नाराज आहेत. अमेरिकेने युद्धाची आपल्याला कल्पना दिली नसल्याचे त्यांनी म्हटले. अमेरिकेच्या अध्यक्षांनी थेटपणे काही देशांना मदत मागितली. पण एकही देश अमेरिकेच्या मदतीला पुढे आला नाही. दुसरीकडे रशिया आणि चीन इराणच्या मदतीला जाहीरपणे येताना दिसले. इराणने स्पष्ट शब्दात म्हटले होते की, चीन आणि रशिया आम्हाला मदत करत असून आम्ही त्यांचे आभारी आहोत. इराणचे सर्वोच्च नेते हल्ल्यात ठार झाल्यानंतर इराण युद्धात काहीच करणार नाही, असा अंदाज अमेरिकेचा होता. पण प्रत्यक्षात सर्वकाही उलटे झाल्याचे बघायला मिळाले.



भारत आणि इराण चांगले मित्र आहेत. होर्मुज खाडी बंद असतानाही इराणकडून भारतीय जहाजांना सुरक्षित रस्ता दिला जात होता. त्यामध्येच त्यांनी जाहीर केले की, होर्मुज खाडी भारतासाठी खुली आहे, त्यांना सुरक्षित मार्ग दिला जाईल. आता एक अत्यंत मोठी बातमी पुढे येताना दिसत आहे. जगाला पुन्हा एकदा भारत आणि इराणची मैत्री दिसली आहे. इराण आणि भारतात पुन्हा एकदा इंधन व्यापार झाल्याचे बघायला मिळत आहे. इराणचे पहिले एलपीजीचे जहाज या आठवड्यात भारतात येणार आहे. भारतात एलपीजी गॅसचा मोठा तुटवडा असताना इराण भारताच्या मदतीला आला आहे. काही वर्षांनंतर भारत आणि इराणमध्ये इंधन व्यापार होत आहे. याच आठवड्यात इराणचे जहाज एलपीजी गॅस घेऊन भारतात दाखल होईल.

## अमेरिकेचे आणखी एक पाऊल मागे

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आणखी एक पाऊल मागे घेतले आहे. पुढील १० दिवस इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ले न करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. इराणच्या विनंतीवरून हा निर्णय घेतल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. 'ट्रुथ सोशल' या वेबसाइटवर डोनाल्ड ट्रम्प यांनी एक पोस्ट शेअर केली आहे. त्यानुसार, इराण सरकारच्या विनंतीवरून वीज प्रकल्पांवर हल्ले करण्याची कारवाई १० दिवस थांबवत आहे. सोमवार, ०६ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८ वाजेपर्यंत हा निर्णय लागू राहील. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाटाघाटी सुरू असून त्या सकारात्मक दिशेने पुढे जात आहेत. चर्चा सुरू असून त्या खूप चांगल्या प्रकारे सुरू आहेत, असे सांगत ट्रम्प यांनी प्रसारमाध्यमांवरील वृत्ते फेटाळून लावली. ट्रम्प नरमले, पण इस्रायल ऐकायला तयार नाही युद्ध तीव्र झाल्यापासून अमेरिकेने इराणच्या वीज प्रकल्पांना लक्ष्य करणारे हल्ले औपचारिकपणे कमी करण्याची ही पहिलीच वेळ आहे. परंतु दुसरीकडे इस्रायल ऐकत नसल्याचे समोर येत आहे. इस्रायलकडून इराणच्या अनेक ठिकाणांवर हल्ले सुरूच असल्याचे पाहायला मिळत आहे. १० दिवस हल्ले न करण्याचा निर्णय म्हणजे युद्ध थांबण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे पडले असून यामुळे राजनैतिक वाटाघाटींचा मार्ग मोकळा होऊ शकतो, असे मत काही तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ | ✻ कर्ज व्याजदर कमी | ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25